# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- १००-२३** **दिनांक :- २८/०३/२०२३**

## २२ किलो ८० ग्रॅम वजनाचा ०४,४१,६००/- रुपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ विक्री करीता बाळगणा-या आरोपीतांवर अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई.

मिरा- भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत मिरारोड (पुर्व) परिसरात अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणा-या ईसमांविरुध्द कारवाई करण्याबाबत वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते.

त्याअनुषंगाने दिनांक २८/०३/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पो.नि. श्री. अमर मराठे हे पोलीस पथकासह मिरारोड (पुर्व) परिसरात गस्त करीत असताना काशिमीरा नाक्याकडे येणा-या सर्विसरोडवर, पेट्रोल पंपाचे पुढील बाजुस संशयास्पद स्थितीत उभ्या असलेल्या इसमाची अंगझडती घेतली असता त्याचे कब्ज्यात ११.०९० किलो ग्रॅम वजनाचा ०२,२१,८००/-रु किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आला. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव रॉकी अच्छेलाल गौंड असे सांगितले तसेच त्याच्याच शेजारी संशयास्पद स्थितीत उभ्या असलेल्या इसमाची अंगझडती घेतली असता त्याचे कब्ज्यात १०.९९० किलो ग्रॅम वजनाचा ०२,१९,८००/-रु. किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असल्याचे निदर्शनास आले. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव सचिन गोटीप्रसाद कुमार दोन्ही रा. एम.एस.चाळ, गणेश नगर, धानिवबाग, नालासोपारा (पुर्व), ता. वसई. जि. पालघर असे सांगितले. नमुद कारवाई मध्ये एकुण २२.०८० किलो ग्रॅम वजनाचा ०४,४१,६००/-रु. किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ अंगझडती पंचनाम्याव्दारे जप्त करण्यात आला असुन नमुद अरोतीतांविरुध्द पो.हवा. विष्णु घरबुडे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. ।। २३१/२३ एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) ।। (क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास काशिमीरा पोलीस ठाणे करत आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पो.नि. श्री. अमर

मराठे, स.पो.नि. अमोल अंबावणे, विलास कुटे, पो. हवा. टक्के, घरबुडे, इंगळे, पाटील, सपकाळ, अव्हाड, पो.अंम. यादव यांनी केली आहे.




----000----